महाराष्ट्र लोकसेवा आयोग

MAHARASHTRA PUBLIC SERVICE COMMISSION

मुख्य कार्यालय

बँक ऑफ इंडिया इमारत, 3 रा मजला, महात्मा गांधी मार्ग, हुतात्मा चौक, मुंबई ४००००१ ☎ २२६७ 0210 /148 /248,22102222 फॅक्स : 22673915

Bank of India Bldg, 3rd floor, Mahatma Gandhi Road, Hutatma Chowk, Mumbai 400001 ☎ 2267 0210/148/248, 22102222 Fax : 22673915

**माझगांव कार्यालय**

विक्रीकर भवन, 9 वा मजला,रुम नंबर 915, सरदार बलवंतसिंग दोधी मार्ग, माझगांव, मुंबई ४००२०३ ☎ २३७४२१९१ फॅक्स : 23781061

Vikrikar Bhavan, 9th floor, Room No.915, Sardar Balvantsing Dodhi Marg, Mazgaon, Mumbai 400203 ☎ 23742191 Fax : 23781061

**ई-मेल sec.mpsc@maharashtra.gov.in, mpscpre@gmail.com वेबसाईट – www.mpsc.gov.in, www.mahaonline.gov.in**

## राज्य सेवा (पूर्व) परीक्षा -२०१४

**जाहिरात क्रमांक :१२३ /२०१३ क्रमांक १४७७(१)/२०१४/तीन**

निम्नलिखित पदांकरिता राज्य सेवा (पूर्व) परीक्षा - २०१४ **रविवार, दिनांक** २ फेब्रुवारी, २०१४ रोजी महाराष्ट्रातील ३५ **जिल्हाकेंद्रावर** घेण्यात येईल. प्रस्तुत जाहिरातीत नमूद केलेल्या अटींची पूर्तता करणा-या उमेदवारांकडून **ऑनलाईन** पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. पूर्व परीक्षेत अर्हताप्राप्त ठरणा-या उमेदवारांना मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र समजण्यात येईल.

**२. उपलब्ध पदसंख्या :-**

| अ. क्र. | पदाचे नाव व एकूण पदसंख्या | अराखीव | अ.जाती व त्यातील बौध्द धर्मांतरित | अनुसूचित जमाती | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | वि.मा.प्र. | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | इ.मा.व |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) |
| १ | **पोलीस उपअधीक्षक/सहायक पोलीस आयुक्त, गट अ (एकूण २४ पदे)** | १२ | ४ | -- | १ | -- | १ | १ | २ | ३ |
| | महिला - | ४ | १ | -- | -- | -- | -- | -- | १ | १ |
| | खेळाडू - | १ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| २ | **उपमुख्य कार्यकारी अधिकारी /गट विकास अधिकारी गट-अ (एकूण ९ पदे)** | ४ | २ | १+१* | -- | १ | -- | -- | -- | -- |
| | महिला - | १ | १ | १ | -- | -- | -- | -- | -- | -- |
| | खेळाडू - | १ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| | अपंग - | @ क्षीणदृष्टी - १ पद | | | | | | | | |
| ३ | **सहायक संचालक/महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा गट-अ (एकूण ७ पदे)** | ४ | -- | ३ | -- | -- | -- | -- | -- | -- |
| | महिला - | १ | -- | १ | -- | -- | -- | -- | -- | -- |
| | खेळाडू - | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| ४ | **कक्ष अधिकारी , गट-ब (एकूण २ पदे)** | -- | -- | १ | -- | -- | -- | -- | -- | १ |
| | महिला - | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| | खेळाडू - | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| ५ | **सहायक गट विकास अधिकारी गट-ब (एकूण ४६ पदे)** | २१ | ६+२* | ३ | १+१* | १+१* | १ | १ | १ | ७ |
| | महिला - | ७ | ३ | १ | -- | -- | -- | -- | -- | २ |
| | खेळाडू - | १ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ |
| ६ | **सहायक निबंधक, सहकारी संस्था, गट-ब (एकूण १० पदे)** | ६ | ३ | १ | -- | -- | -- | -- | -- | -- |
| | महिला - | २ | १ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| | खेळाडू - | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| | अपंग - | @ चलन वलन विषयक विकलांगता किंवा मेंदूचा अर्धांगवायू- १ पद | | | | | | | | |
| ७ | **उपअधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, गट ब (एकूण २ पदे)** | २ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| | महिला - | २ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| | खेळाडू - | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ८ | **सहायक आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, गट ब** (**एकूण १ पद**) | -- | १ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| | महिला - | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| | खेळाडू - | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| ९ | **सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी, गट ब** (**एकूण ३ पदे**) | २ | -- | -- | -- | -- | -- | १ | -- | -- |
| | महिला - | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| | खेळाडू - | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |

**टीप** :- * अशी खूण केलेली पदे अनुशेषाची आहेत. इतर संवर्गाकरिता शासनाकडून पदे उपलब्ध होण्याची शक्यता आहे, ती उपलब्ध झाल्यास त्यांचा समावेश मुख्य परीक्षेच्या अधिसूचनेत करण्यात येईल.

२.१ उपरोक्त नमूद केलेल्या पदसंख्येत व आरक्षणामध्ये शासनाच्या संबंधित विभागाच्या सूचनेनुसार बदल होण्याची शक्यता आहे.

२.२ महिला व खेळाडूंसाठी आरक्षित असलेली पदे सबंधित वर्गवारीतील भरावयाच्या एकूण पदसंख्येपैकी असतील.

२.३ महिलांसाठी असलेले आरक्षण शासननिर्णय महिला बालविकास व विभाग क्र .८२/२००१/म.से.आ २०००/प्र. क्र. ४१५/का-२ दिनांक २५ मे, २००१ आणि तदनंतर शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहील.

२.४ खेळाडूंचे आरक्षण शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहील.

२.५ अपंग उमेदवारांची पात्रता शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहील. अपंगासाठी असलेली पदे भरावयाच्या एकूण पदसंख्येपैकी असतील. उपरोक्त टिपे मध्ये उल्लेख केल्यानुसार इतर संवर्गाकरिता शासनाकडून पदे उपलब्ध झाल्यास त्यातील काही संवर्गात शासनाकडून अपंगासाठी पदे उपलब्ध होण्याची शक्यता आहे.

२.६ अपंग उमेदवारांना गुणवत्तेनुसार लेखनिकाची मदत घेता येईल. तथापि, त्यांनी तसे आयोगास स्वतंत्ररित्या परीक्षेपूर्वी १० दिवस अगोदर पत्राने कळविणे अनिवार्य आहे.

३. **वेतनश्रेणी** :-

३.१ गट -अ च्या पदांकरिता रूपये १५,६००-३९,१००, नियमानुसार ग्रेड पे अधिक भत्ते.

३.२ गट-ब च्या पदांकरिता रूपये ९,३००-३४,८००, नियमानुसार ग्रेड पे अधिक भत्ते.

४. **पात्रता** :-

४.१. भारतीय नागरीकत्व

४.२ **वयोमर्यादा :-**

४.२.१ उपरोक्त पदाकरिता दिनांक १ एप्रिल, २०१४ रोजी वय किमान १९ वर्षे असावे व कमाल ३३ वर्षापेक्षा जास्त नसावे.

४.२.२ उपजिल्हाधिकारी संवर्गाकरिता मागणीपत्र शासनाकडून प्राप्त झाल्यास सदर पदासाठी वयोगणनेचा दिनांक १ एप्रिल, २०१४ असेल.

४.२.२ उच्च वयोमर्यादा खालील बाबतीत शिथिलक्षम :-

(१) महाराष्ट्र शासनाने मान्यता दिलेल्या मागासवर्गीय उमेदवारांच्या बाबतीत ५ वर्षांपर्यंत.

(२) अपंग उमेदवारांच्या बाबतीत ४५ वर्षांपर्यंत.

(३) पात्र खेळाडूंच्या बाबतीत ५ वर्षांपर्यंत.

(४) माजी सैनिक/ आणीबाणी व अल्पसेवा राजादिष्ट अधिकारी यांचेसाठी कमाल वयोमर्यादा ५ वर्षांपर्यंत.

(५) विहित वयोमर्यादा इतर कोणत्याही बाबतीत शिथिल केली जाणार नाही.

**४.३ शैक्षणिक अर्हता** :-

४.३.१ उपलब्ध पदसंख्येतील क्र. १ ते ८ वरील पदांसाठी मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी किंवा महाराष्ट्र शासनाने मान्य केलेली समतुल्य अर्हता.

४.३.२ वित्त व लेखा सहायक संचालक पदासाठी शासनाच्या वित्त विभाग अधिसूचना दि.१३ सप्टेंबर, २०१२ नुसार महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा सहायक संचालक गट-अ पदासाठी पुढीलपैकी अर्हता आवश्यक

(क) सांविधिक विद्यापीठाची, किमान ५५ टक्क्यांसह वाणिज्य शाखेची स्नातक पदवी, किंवा

(ख) इन्स्टिटयुट ऑफ चार्टर्ड अकांऊटस ऑफ इंडीया यांनी घेतलेली सनदी लेखापालाची अंतिम परिक्षा उत्तीर्ण केली असेल, किंवा

(ग) इन्स्टिटयुट ऑफ कॉस्ट अँड वर्क्स अकांऊटस यांनी आयोजित केलेली परिव्यय लेखाशास्त्रतील अंतिम परीक्षा उत्तीर्ण आहेत, किंवा

(घ) सांविधिक विद्यापीठाची वाणिज्य मधील पदव्युत्तर पदवी : किंवा

(ड) अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या मान्यताप्राप्त संस्थेमधून वित्त व्यवसाय प्रशासन या विशेषज्ञतेसह पदव्युत्तर पदवी (एम.बी.ए.)

४.३.३ सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी, गट-ब पदाकरिता अभियांत्रिकी किंवा भौतिक शास्त्र आणि गणित विषयासह विज्ञान शाखेतील पदवी

४.३.४ पदवी परीक्षेस बसलेले उमेदवार सुध्दा या पूर्व परीक्षेस तात्पुरते पात्र असतील. परंतु राज्य सेवा (पूर्व) परीक्षा- २०१४ मधून अर्हताप्राप्त ठरणा-या उमेदवारांनी राज्य सेवा (मुख्य) परीक्षा २०१४ ची माहिती स्वीकारण्याच्या विहित अंतिम दिनांकापर्यन्त पदवी परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील. तसेच ज्या पदवीसाठी अंतर्वासिता किंवा कार्यशाळेतील कामाचा अनुभव आवश्यक असेल त्या पदवीधारकाने ही अट मुख्य परीक्षेची माहिती स्वीकारण्याच्या विहित अंतिम दिनांकापर्यन्त पूर्ण केली असली पाहिजे.

४.३.५. सर्व पदांसाठी मराठीचे ज्ञान आवश्यक राहील.

५. प्रस्तुत जाहिरातीमध्ये परीक्षेसंदर्भातील संक्षिप्त तपशील दिलेला आहे.अर्ज करण्याची पद्धत, आवश्यक अर्हता, आरक्षण, वयोमर्यादा, शुल्क, निवडीची सर्वसाधारण प्रक्रिया, परीक्षा योजना, अभ्यासक्रम, इत्यादीबाबतच्या सविस्तर तपशीलासाठी आयोगाच्या www.mpsc.gov.in या वेबसाईटवरील स्पर्धा परीक्षा अंतर्गत "**उमेदवारांना सर्वसाधारण सूचना** " तसेच " **परीक्षा** " या विभागातील "**राज्य सेवा परीक्षा**" मध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेल्या माहितीचे कृपया अवलोकन व्हावे. आयोगाच्या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात आलेली माहिती व जाहिरात अधिकृत समजण्यात येईल.

६. उपरोक्त परिच्छेद २ मध्ये नमूद पदांपैकी कक्ष अधिकारी गट-ब हे पद वगळता उर्वरित सर्व पदांना शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाची अधिसूचना दि. ८ जून, २०१० रोजी निर्गमित केलेली "महाराष्ट्र शासकीय गट अ व गट ब (राजपत्रित व अराजपत्रित) पदांवर सरळसेवेने नियुक्तीसाठी विभागीय संवर्ग संरचना व विभागीय संवर्ग वाटप याबाबतची नियमावली २०१०" लागू आहे.

**७. शुल्क** : ७.१ :- **अमागास - रु. ३१५/-** ७.२ :- मागासवर्गीय - **रु. १६५/-** ७.३ :- **माजी सैनिक रु. १५/-**

**८. अर्ज करण्याची पद्धत** :-

८.१ प्रस्तुत परीक्षेसाठी अर्ज फक्त ऑनलाईन पद्धतीने स्वीकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत..

८.२ पात्र उमेदवाराला वेब-बेस्ड (Web-based)ऑनलाईन अर्ज www.mahaonline.gov.in या वेबसाईटद्वारे **दिनांक १६ डिसेंबर, २०१३ ते दिनांक ५ जानेवारी, २०१४** या कालावधीत सादर करणे आवश्यक राहील.

८.३ ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना आयोगाच्या www.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

८.४ विहित पद्धतीने आयोगास अर्ज सादर केल्यानंतर परीक्षा शुल्क भरल्याशिवाय अर्ज विचारात घेतला जाणार नाही.

८.५ आयोगाने निश्चित केलेले परीक्षा शुल्क खालील पद्धतीने भरता येईल :-
(१) भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे (२) नेटबँकिंग (३) डेबिट कार्ड. (४) क्रेडिट कार्ड (५) संग्राम केंद्र/सीएससी (नागरिक सेवा केंद्र)

८.६ www.mahaonline.gov.in येथे संग्राम केंद्र (ग्रामपंचायतीमध्ये) आणि सीएससीची सूची उपलबध आहे.

८.७ परीक्षा शुल्काचा भरणा करण्याकरिता उमेदवारांनी खाली नमूद केलेल्या पद्धतींचा अवलंब करावा :-

(१) शुल्क भरण्याकरिता मुख्य पृष्ठाच्या डाव्या भागावरील " माझे खाते " या लिंक वर क्लिक करावे.

(२) "माझे खाते " " या लिंक वर क्लिक केल्यानंतर उमेदवाराने अर्ज केलेल्या पदांची यादी शुल्क भरल्याच्या / न भरल्याच्या नोंदीसह दिसेल. ज्या पदासमोर " ' **Unpaid** ' असे लिहिलेले असेल, त्या ठिकाणी " '**Pay Now**' अशी लिंक उपलब्ध असेल.

(३) "" **Pay Now** " या लिंक वर क्लिक केल्यानंतर 3 पर्याय उपलब्ध होतील. 1. ऑनलाईन पेमेंट 2. नागरी सुविधा केंद्र 3. चलानद्वारे

(४) उमेदवार क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड अथवा नेटबँकिंगच्या सहाय्याने ऑनलाईन पेमेंट करु शकतील.

(५) नागरी सुविधा केंद्र हा पर्याय निवडल्यास, उपलब्ध होणा-या पावतीची प्रत घेऊन नागरी सुविधा केंद्र अथवा संग्राम केंद्रात जाऊन शुक्लाचा भरणा केला जाऊ शकतो. उपरोक्त कार्यवाही अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकापूर्वी पूर्ण करणे आवश्यक राहील.

(६) उमेदवाराने चलनाद्वारे हा पर्याय निवडल्यास, उपलब्ध होणा-या चलनाची प्रत घेऊन भारतीय स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेत, बँकेच्या कार्यालयीन वेळेत शुक्लाचा भरणा केला जाऊ शकतो.

(७) ज्या उमेदवारांना भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे शुल्क भरावयाचे आहे असे उमेदवार अर्ज सादर केल्याच्या दोन तासानंतर अथवा शेवटच्या दिवशी अर्ज सादर करणा-या उमेदवारांनी त्यापुढील कामकाजाच्या दिवशी बँकेच्या कार्यालयीन वेळेत परीक्षा शुल्क भरणे आवश्यक आहे.

(८) परीक्षा शुल्काचा भरणा केल्यानंतर - उमेदवाराला परीक्षा केंद्राची निवड करणे आवश्यक आहे. त्याकरिता " माझे खाते " मधील आवश्यक पदाची निवड करावी. त्यानंतर " केंद्र निवडा " या पर्यायावर क्लिक करावे. सदर पर्यायांतर्गत निवडलेल्या केंद्राची क्षमता दर्शविली जाईल. जर केंद्राच्या क्षमतेइतक्या उमेदवारांचे अर्ज तत्पूर्वी प्राप्त झाले असतील, तर सदर केंद्र उपलब्ध नसून, दुसरे केंद्र निवडावे, असा संदेश प्राप्त होईल. केंद्राची निवड केल्यानंतर सेव्ह बटनावर क्लिक केल्यास केंद्र निवडीची व अर्ज भरण्याची प्रक्रिया पूर्ण होईल.

(९) जे उमेदवार भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे शुल्काचा भरणा करतील, असे उमेदवार शुल्क भरल्याच्या दिनांकाच्या दुस-या दिवशी केंद्र निवडिची प्रक्रिया करु शकतील. जर हा दुसरा दिवस कार्यालयीन सुट्टी अथवा रविवारचा असेल तर उमेदवार सदर कार्यावाही त्यानंतर लगेच येणा-या पुढील कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी करु शकतील.

८.८ प्रस्तुत परीक्षेपूर्वी ७ दिवस अगोदर उमेदवारास प्रवेशप्रमाणपत्र त्याच्या प्रोफाईलद्वारे उपलब्ध करुन देण्यात येईल. त्याची प्रत उमेदवाराने परीक्षेपूर्वी डाऊनलोड करुन घेणे व परीक्षेच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

९. परीक्षेच्या वेळी उमेदवाराने प्रवेशप्रमाणपत्र आणणे सक्तीचे आहे. त्याशिवाय, परीक्षेस प्रवेश दिला जाणार नाही.

१०. प्रस्तुत जाहिरातीमध्ये परीक्षेसंदर्भातील संक्षिप्त तपशिल दिलेला आहे. पूर्व परीक्षेच्या प्रवेशासाठी माहिती स्वीकारण्याची पध्दत आवश्यक अर्हता, आरक्षण, वयोमयाृदा, शुल्क, निवडीची सर्वसाधारण प्रक्रिया,परीक्षा योजना, अभ्यासक्रम इत्यादीबाबतच्या सविस्तर तपशिलासाठी आयोगाच्या www.mpsc.gov.in या वेबसाईटवरील स्पर्धा परीक्षेअंतर्गत उमेदवारांना सर्वसाधारण सूचना तसेच परीक्षा विभागातील पोलीस उपनिरीक्षक परीक्षामध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेल्या माहितीचे कृपया अवलोकन करावे. आयोगाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आलेली माहिती व जाहिरात अधिकृत समजण्यात येईल. सदर जाहिरात आयोगाच्या www.mpsc.gov.in व www.mahaonline.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

११. विहित पध्दतीने अर्ज सादर करुन शुल्क भरण्याची तसेच स्टेट बँकेमध्ये परीक्षा शुल्क भरण्याकरिता चलनाची प्रत घेण्याची कार्यवाही **दिनांक ५ जानेवारी, २०१४ रोजी २३.५९** वाजेपर्यंत पूर्ण करणे आवश्यक आहे. त्यानंतर सदर वेबलिंक बंद होईल.

१२. चलनाद्वारे **परीक्षाशुल्क भरावयाचे झाल्यास** भारतीय स्टेट बँकेमध्ये **दिनांक ६ जानेवारी, २०१४** पर्यंत बँकेच्या कार्यालयीन वेळेत भरणे बंधनकारक आहे. विहित दिनांकानंतर परीक्षा **शुल्क** भरल्यास वैध मानले जाणार नाही, तसेच परीक्षा **शुल्काचा** परतावाही केला जाणार नाही.

**१३. राज्य सेवा (पूर्व) परीक्षेचा अभ्यासक्रम व योजनेत राज्य सेवा (पूर्व) परीक्षा २०१३ पासून सुधारणा करण्यात आली असून त्यास अनुसरुन राज्य सेवा (पूर्व) परीक्षा- २०१४ करिता वस्तुनिष्ठ स्वरुपाचे दोन पेपर्स आहेत.**

१४. राज्य सेवा (पूर्व) परीक्षेचा अभ्यासक्रम आयोगाच्या **www.mpsc.gov.in** या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

ठिकाण : मुंबई
दिनांक : १६ डिसेंबर, २०१३.

प्र.मा. आचरेकर
उप सचिव,महाराष्ट्र लोकसेवा आयोग.

**आयोगाच्या कार्यालयात, परीक्षा कक्षात, परीक्षा केंद्राच्या परिसरात, तसेच, शारीरिक चाचणी व मुलाखतीच्या वेळी मोबाईल फोन, अथवा इतर कोणत्याही प्रकारची इलेक्ट्रॉनिक साधने आणण्यास व वापरण्यास सक्त मनाई आहे.**